# जनसंपर्क अधिकारी

**मिरा-भाईंदर, वसई-विरार पोलीस आयुक्तालय**
**रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व ता. जि. ठाणे**
**फोन नं. ०२२-२९४५१००१**
Mail ID- pro cp.mb-vv@mahapolice.gov.in


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

**प्रेसनोट क्रमांक:- ८३-२३** **दिनांक:- १५/०३/२०२३**

## अंमली पदार्थ बाळगणा-या महिला आरोपीस अटक करुन ०९,३३,४००/- रुपये किंमतीचा अंमली पदार्थ जप्त - तुळींज पोलीस ठाणे, गुन्हे प्रकटीकरण पथकाची कामगिरी.

दिनांक १४/०३/२०२३ रोजी तुळींज पोलीस ठाणे गुन्हे प्रकटीकरण पथकाचे पो.हवा. उमेश वरठा यांना गुप्त बातमीदारामार्फत माहिती मिळाली की, साई श्रध्दा अपारटमेंट, रुम नं. ०५, वर्धमान पार्कचे समोर विजयनगर नालासोपारा (पुर्व) येथील राहत्या घरात एक महिला गर्द, मेफेड्रॉन या अंमली पदार्थाची विक्री करीत आहे. मिळालेल्या माहितीच्या अनुषंगाने कारवाई करणेबाबत वरिष्ठांचे आदेश व मार्गदर्शनाप्रमाणे गुन्हे प्रकटीकरण पथकाचे पोलीस अधिकारी व अंमलदार यांनी कायदेशीर बाबींची पुर्तता करुन वर नमुद राहत्या घरी पंचासमक्ष छापा कारवाई केली असता महिला नामे सौ. गिता उदय स्वामी, वय ५२ वर्षे हिच्या अंगझडतीत ८८ ग्रॅम वजनाचा ०८,८०,००० /- रुपये किंमतीचा मेफेड्रॉन अंमली पदार्थ, १०.५६० ग्रॅम वजनाचा ५२,८००/- रुपये किंमतीचा गर्द (ब्राउन शुगर) हा अंमली पदार्थ तसेच ६००/- रुपये रोख रक्कम असा एकुण ०९,३३,४००/- रुपये किंमतीचा मुद्देमाल मिळुन आल्याने तो जप्त करण्यात आला.

सदर महिलेविरुध्द तुळींज पोलीस ठाणेत गुन्हा. रजि. नं. २२९/२०२३ एन.डी.पी.एस. कायदा १९८५ चे कलम ८ क, २२ (क) अन्वये दिनांक १४.०३.२०२३ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला असुन तिस अटक करण्यात आली आहे. सदर महिला ही सराईत अंमली पदार्थ विक्री करणारी असुन तिचेविरुध्द यापुर्वी देखील तुळींज पोलीस ठाणेत गुन्हा. रजि. नं. १२७५/२०२१ एन.डी.पी.एस. कायदा कलम ८ (क), २१(अ) प्रमाणे गुन्हा नोंद आहे

सदरची कामगिरी श्री. सुहास बावचे, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ २ वसई, श्री. चंद्रकांत जाधव सहाय्यक पोलीस आयुक्त, नालासोपारा विभाग अति. कार्यभार तुळींज विभाग यांचे मार्गदर्शनाखाली तुळींज पोलीस ठाणेचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. शैलेंद्र नगरकर, गुन्हे प्रकटीकरण पथकाचे स.पो.नि मिथुन म्हात्रे, पो.उप.निरी बाळासाहेब बांदल, स.फौ. शिवानंद सुतनासे, पो.हवा. नागरे, आनंद मोरे, उमेश वरठा, जमादार, पांडुरंग केंद्रे , म.पो.हवा. मेहेर, पो.अंम. छपरीबन, राउत, खेमनार यांनी केली आहे.

------ ०००० ------